**नियमीत दिवाणी दावा क्र.१३५/२०१३ मध्ये निशाणी १०६ वरील आदेश**

०१. सदरचा अर्ज हा प्रतीवादींनी रमेश सज्जन आहेर यांना साक्षीसमन्स काढण्यासाठी व दिनांक ०४/०६/२००८ रोजी प्रतिवादीच्या मालकीच्या मिळकतीबाबत झालेल्या साठेखत व भरणापावतीचा दस्ताची प्रत न्यायालयात सादर करण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे रमेश आहेर व वादी हे सख्खे भाउ आहेत. वादींचा साक्षीदार बी.डी.देशमुख यांनी दिलेला साक्षीपुरावा व दाखल केलेले कागदपत्रे रमेश आहेर यांनी दिनांक ०४/०६/२००८ रोजीचा दस्त प्रतिवादीच्या गैरहजेरीत व विनापरवानगी नोंदविलेला आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०२. वादीने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दाखल केले. वादीच्या कथनाप्रमाणे रमेश आहेर याचा व दाव्यामधील दस्तांचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे त्यांना दाव्यात साक्षीदार म्हणुन बोलाविता येणार नाही. प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये साक्षीदार व त्याच्या सोबत झालेल्या कागदपत्रांबाबत काहीही नमुद केले नाही. त्यामुळे साक्षीदाराला बोलाविण्यासाठी कोणतेही संयुक्त कारण नाही.

०३. प्रतीवादी व वादीच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व पटलावरील कागदपत्र यांचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दिनांक ०४/०६/२००८ रोजीच्या साठेखतानुसार रक्कम रुपये ११,०००/— स्वीकारुन खरेदीखत करुन देण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादीच्या साक्षीदाराने त्याचया पुराव्यात प्रतिवादींच्या गैरहजेरीत साठेखत केले आहेत. वादीतर्फे सा.क्र. ०३ यांचा पुरावा नि. क्र. ९५ अन्वये नोंदविण्यात आला आहे. परंतु सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता साक्षीदाराने प्रतिवादींच्या गैरहजेरीत दस्त नोंदणीकृत केला याबाबत कोणताही तोंडी पुरावा दिला नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रतिवादींचे

कथन हे संयुक्तीक वाटत नाही. तसेच, प्रतिवादीने त्याच्या कैफियतमध्ये साक्षीदार रमेश आहेर व त्यांच्यामध्ये झालेल्या दस्ताबाबत कोणताही उल्लेख केला नाही. तसेच प्रतिवादीने साक्षीदारांसोबत नोंदविलेला दस्त व सदर दाव्यातील संबंध प्रस्थापीत करण्यासाठी कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. त्यामुळे प्रतिवादीचा सदरचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## —:: **आदेश** ::—

०१. नि.क्र. १०६ वरील अर्ज ना—मंजुर करण्यात येत आहेत.

०२. खर्चाबाबत आदेश नाही.

( डि.एम.गित्ते )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— १८/०४/२०२३.